॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

*** सुविचार ***

प्रयत्न करणे कधीही सोडू नका,
अपयश हा यशाच्या मार्गातील
फक्त एक टप्पा आहे.

▪ अहिल्यानगर ▪ बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२६ | ▪ वर्ष ७ वे ▪ अंक ६७ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये | ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

# जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु

## ३,६७७ मतदार निश्चित । ३६६ संस्थांचे ठराव अपात्र, २३३ संस्थांनी ठरावच दिले नाहीत

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** गेल्या चार महिन्यांपासून प्रशासकाच्या ताब्यात असलेल्या अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीची प्रक्रिया अखेर सुरू झाली आहे. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक संभाजी निकम यांनी बुधवारी (दि. १९) प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली. या यादीवर हरकती व सूचना दाखल करण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आली आहे. अंतिम मतदार यादी १५ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध होणार असून, त्यानंतर बँकेच्या २१ संचालकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे.

यंदाच्या निवडणुकीसाठी ३ हजार ६७७ मतदार निश्चित झाले आहेत. यामध्ये सेवा सोसायटी मतदारसंघ, बिगरशेती मतदारसंघ आणि शेतीपूरक मतदारसंघातील ३ हजार ६४७ संस्थात्मक मतदार, तर ३० वैयक्तिक मतदारांचा समावेश आहे.




जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विद्यमान संचालक मंडळाची मुदत २० फेब्रुवारी रोजी संपली होती. त्यानंतर मे महिन्यात बँकेवर प्रशासक मंडळ नियुक्त करण्यात आले. निवडणूक प्रक्रियेचा भाग म्हणून विविध कार्यकारी सेवा सोसायट्या, कृषी पणन संस्था, शेतमाल प्रक्रिया संस्था तसेच बिगरशेती संस्थांकडून १६ जून ते १६ जुलैदरम्यान ठराव मागविण्यात आले होते.

बँकेने निवडणूक अधिकाऱ्यांकडे एकूण ५ हजार ८९० सभासदांची यादी सादर केली होती. त्यापैकी सेवा सोसायटी मतदारसंघातील १ हजार ३६७, बिगरशेती मतदारसंघातील १ हजार ५९५ आणि शेतीपूरक मतदारसंघातील १ हजार ५१ अशा एकूण ४ हजार १३ संस्थांचे ठराव उपलब्ध झाले होते.

निवडणूक यंत्रणेने केलेल्या छाननीत ३६६ ठराव अपात्र ठरले. यामध्ये सेवा सोसायट्यांचे ७, बिगरशेती संस्थांचे १२४ आणि शेतीपूरक मतदारसंघातील २३५ ठरावांचा समावेश आहे. तसेच २३३ संस्थांनी ठराव सादर केले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. यामध्ये सेवा सोसायट्यांच्या २७, बिगरशेती संस्थांच्या १५६ आणि शेतीपूरक मतदारसंघातील ५० संस्थांचा समावेश आहे.

अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २१ संचालक पदांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी काळात जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय हालचालींनाही वेग येण्याची चिन्हे आहेत.

### हरकतींसाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत

▪ प्रारूप मतदार यादी जिल्हा बँकेच्या मुख्यालयासह तालुका विकास अधिकारी कार्यालये, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय आणि तालुकास्तरीय सहनिबंधक कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आली आहे. १९ ऑगस्टपासून ३१ ऑगस्टपर्यंत यादीवर हरकती व सूचना दाखल करता येणार आहेत. प्राप्त हरकती व सूचनांवर १० सप्टेंबर रोजी निर्णय घेतला जाणार असून, १५ सप्टेंबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

## फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### नियमित कर्जदार

थकीतला दोन लाख
नियमित कर्जदार पन्नास
बक्षीस देता की शिक्षा ?
खेळ आता करावा बास
नियमित कर्जदारच देतात
आर्थिक शिस्तीला वळण
प्रामाणिकपणाला साथ द्या
नको पुन्हा तेच जुने दळण

## SPOT NEWS

### शासकीय कर्मचाऱ्यांना महागाई भत्यात २ टक्के वाढ

**● मुंबई –** राज्य सरकारी आणि इतर पात्र सरकारी कर्मचा-यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ करण्यात आली आहे. या निर्णयामुळे कर्मचा-यांचा महागाई भत्ता ५८ टक्क्यांवरून ६० टक्के इतका झाला आहे. महागाई भत्त्यातील ही वाढ पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजे जानेवारी २०२६ पासून लागू होईल. वित्त विभागाने मंगळवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला.वाढीव महागाई भत्ता ऑगस्ट २०२६ पासून लागू आहे. तर जानेवारी २०२६ ते जुलै २०२६ या सात महिन्याच्या कालावधीतील थकबाकीची रक्कम सुद्धा ऑगस्ट महिन्याच्या वेतनसोबत रोखीने दिली जाणार आहे. राज्यातील सुमारे ५ लाखाहून अधिक शासकीय कर्मचारी तसेच सुमारे ८ लाखापेक्षा अधिक सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे.

### मेट्रो आता वसई-विरारपर्यंत धावणार

**● मुंबई –** मुंबई महानगरप्रदेशातील वाहतुकीला चालना देण्यासाठी मेट्रो १३ –मिरा भाईंदर ते वसई विरार या प्रकल्पास, तसेच पुणे शहरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महत्वाचा ठरणा–या पुणे रिंगरोडच्या सोरतापवाडी ते वरवे–शिवरे मार्गास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीची बैठक मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झाली.

# आमदारांच्या पीए, वाहन चालकांच्या मानधनात वाढ

**● मुंबई । वीरभूमी –** विधानसभा आणि विधान परिषदेच्या विद्यमान आमदारांचे स्वीय सहाय्यक (पीए) आणि वाहनचालकांच्या मानधनात प्रत्येकी १० हजार रुपयांची वाढ करण्यात आली आहे. निर्णय घेतला आहे. मानधनातील ही वाढ १ ऑगस्ट २०२६ पासून लागू करण्यात आल्याची माहिती माहिती संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मंगळवारी दिली.

राज्य सरकारच्या निर्णयानुसार आमदारांच्या पीएंचे मासिक मानधन ३० हजार रुपयांवरून ४० हजार रुपये, तर वाहनचालकांचे मासिक मानधन २० हजार रुपयांवरून ३० हजार रुपये झाले आहे. जवळपास चार वर्षानंतर ही मानधन वाढ करण्यात आली आहे. संसदीय कार्य विभागाने आज मानधन वाढीबाबतचा शासन निर्णय जारी केला. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन आणि भत्ते अधिनियम, १९५६ मधील तरतुदींनुसार विधानमंडळाच्या विद्यमान सदस्यांना त्यांचे विधिमंडळाचे प्रशासकीय कामकाज अधिक परिणामकारकपणे पार पाडण्यासाठी पीएची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते.

विधानमंडळ सदस्यांच्या वेतन आणि भत्ते संयुक्त समितीच्या शिफारशीनुसार पीएच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन होता. त्यानुसार आमदारांच्या स्वीय सहाय्यक आणि वाहनचालकांच्या मानधनात १० हजार रुपये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

# एसआयआर सर्वेक्षणात ७५.५२ लाख मतदारांचा ठावठिकाणा नाही




**● मुंबई । वीरभूमी –** राज्यातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाचा (एसआयआर) पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. या प्रक्रियेत राज्यातील ९.७८ कोटी मतदारांपैकी ७५.५२ लाख मतदार अनुपस्थित आहेत किंवा सापडले नाहीत. तर १७.६३ लाख मतदारांची नावे दुबार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

एसआयआर अंतर्गत तयार करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी २४ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणार आहे. प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर महिनाभर दावे व हरकती नोंदविण्यासाठी मुदत दिली जाईल. यादीत नाव नसलेल्या मतदारांना आणि १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांना फॉर्म ६ भरून नाव नोंदविता येणार आहे.

एसआयआर ३० जून ते १७ ऑगस्टदरम्यान बूथस्तरीय अधिकाऱ्यांनी (बीएलओ) राज्यात घरोघरी जाऊन गणना अर्ज जमा केले. ९.७८ कोटी मतदारांच्या अर्जापैकी २.०७ कोटी मतदारांचे गणना अर्ज संकलित झाले नाहीत. यापैकी ७५.५२ लाख मतदार अनुपस्थित अथवा सापडले नाहीत, तर ७६.८० लाख मतदार कायमस्वरूपी स्थलांतरित झाले आहेत. ३४.८१ लाख मतदार मृत असून, १७.६३ लाख मतदारांची नावे अन्यत्र आधीच नोंदलेली किंवा दुबार असल्याचे आढळले आहे. अन्य कारणांमुळे २.२३ लाख अर्ज या श्रेणीत आहेत.

### अंतिम मतदार यादी २७ ऑक्टोबर रोजी

▪ असंकलित मतदारांच्या तात्पुरत्या याद्या संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या संकेतस्थळांवर चार दिवसांपूर्वी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. राजकीय पक्षांच्या बूथस्तरीय प्रतिनिधींना या याद्यांतील मतदारांबाबत माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले असून पात्र मतदारांकडून आवश्यक अर्ज मिळवून त्याची बीएलओमार्फत पडताळणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दुरुस्तीसाठी फॉर्म ८, तर मतदाराचे नाव वगळण्यास हरकत घेण्यासाठी फॉर्म ७ दाखल करता येईल. खोटी माहिती किंवा घोषणा दिल्यास लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५० च्या कलम ३१ नुसार एक वर्षापर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. अंतिम मतदार यादी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

# योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून प्रशासन लोकाभिमुख करा

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया । महसूल दिनानिमित्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा गौरव

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना आणि विकासात्मक उपक्रमांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने योजनांची प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणी करावी. नागरिकांच्या अडचणी समजून घेत त्यांचे प्रश्न वेळेत सोडविणारे आणि नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून काम करणारे लोकाभिमुख प्रशासन निर्माण करण्यावर भर द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.




जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल दिनानिमित्त उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे, वर्षा पवार, शारदा जाधव, भुसंपादन अधिकारी गौरी सावंत, हेमा बडे, भारती सागरे यांच्यासह तहसिलदार नागेश गायकवाड, पाथर्डी तहसिलदार उध्दव नाईक आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, महसूल विभाग नेहमी अग्रेसर असणारा विभाग आहे. शासकीय योजनांच्या प्रसिध्दीपासून ते आपत्ती व्यवस्थापनापर्यंत महसूल विभाग कार्य करत असतो. शासनाच्या योजना, विकासकामे आणि प्रशासकीय सेवा यांचा केंद्रबिंदू सामान्य नागरिक असला पाहिजे. प्रशासनातील प्रत्येक घटकाने समन्वयाने, जबाबदारीने आणि संवेदनशीलतेने काम केल्यास लोकांचा शासन–प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल. त्यामुळे प्रभावी प्रशासन उभारण्याचा संकल्प प्रत्येक अधिकारी–कर्मचाऱ्याने करावा असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

निवासी उपजिल्हाधिकारी श्री. गिते यांनी आपल्या प्रास्ताविकातून महसूल दिनाचे महत्त्व, महसूल प्रशासनाची भूमिका तसेच नागरिकांना पारदर्शक आणि तत्पर सेवा देण्याचे महत्त्व अधोरेखित केले. महसूल विभाग हा शासन आणि नागरिकांमधील महत्त्वाचा दुवा असून, लोकाभिमुख प्रशासनाच्या माध्यमातून नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी अधिकारी–कर्मचाऱ्यांनी संवेदनशीलतेने व जबाबदारीने काम करावे, असे त्यांनी नमूद केले.

### जनगणना २०२७ चे पहिल्या टप्पा (घरयादी आणि घरगणना) उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी

▪ निवासी उपजिल्हाधिकारी तथा, जिल्हा जनगणना अधिकारी दादासाहेब रघुनाथ गिते, तहसिलदार सा.प्र.तथा अति.जनगणना अधिकारी नागेश बाळकृष्ण गायकवाड, नायब तहसिलदार सा.प्र. तथा अति.जनगणना अधिकारी शंकर विजय रोडे, तहसिलदार उध्दव बाळकृष्ण नाईक, सहायक महसुल अधिकारी पोटे सचिन अण्णासाहेब, अकोलेचे मुख्याधिकारी धनश्री सुधाकर पवार, नायब तहसिलदार गौरव दळवी, मास्टर ट्रेनर हेमंत पाटील, जामखेड न.पाचे अजय साळवे, पर्यवेक्षक बाचकर विकास पोपट, राहुरी न.पा.चे प्रगणक युवराज रामचंद्र भोसले, शेवगावचे फिल्ड ट्रेनर भागवत श्रीधर रामराव, चार्ज अधिकारी लिपिक निलेश निवृत्ती इंगळे.

### पुरस्कार प्राप्त अधिकारी व कर्मचारी

▪ भुसंपादन क्र.१ उपजिल्हाधिकारी अतुल पंडीत चोरमारे, पाथर्डीचे तहसिलदार उध्दव बाळकृष्ण नाईक, गृह शाखा नायब तहसिलदार मयुर मच्छिंद्र बेरड, सहायक महसुल अधिकारी दत्तात्रय अनिल गंधाडे, महसुल सहायक संदिप रघुनाथ बनसोडे, शिर्डीचे मंडळ अधिकारी विजयसिंग पन्नालाल नायमाने, चिंभळेचे ग्राम महसुल अधिकारी महेंद्र प्रकाश शिंदे, शिपाई किसन भागवत भालेराव, महसुल सेवक सचिन कोंडीभाऊ ढेरंगे

# SPOT NEWS

## दूध टँकरची दुचाकीला धडक; ५८ वर्षीय दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

**● अकोले । वीरभूमी –**
अकोले तालुक्यातील लिंगदेव येथील ठाकरवाडी परिसरात दुचाकी आणि दूध टँकरची जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. सोमवारी, दि. १७ रोजी सकाळी झालेल्या या अपघातात लहित बुद्रुक येथील पांडुरंग रखमा चौधरी (वय ५८) यांचा जागीच मृत्यू झाला. एमएच १७ सीजे ६२५० क्रमांकाची दुचाकी आणि एमएच १६ सीसी १२४७ क्रमांकाच्या दूध टँकरमध्ये जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की चौधरी यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. या घटनेमुळे लहित बुद्रुक गावावर शोककळा पसरली आहे. अकोले शहर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून, पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## अनुराधा मिश्रा यांची 'स्ट्राँग वुमन ऑफ इंटरनॅशनल' किताबावर मोहोर

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
सावेडी परिसरातील अनुराधा रत्नेश मिश्रा यांनी कोलंबो, श्रीलंका येथे झालेल्या आमंत्रित आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत मास्टर वन महिला गटात 'स्ट्राँग वुमन ऑफ इंटरनॅशनल' किताब व चषक पटकावला. श्रीलंका सरकार व संयुक्त भारतीय खेळ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या स्पर्धेत १२० देशांतील खेळाडूंनी सहभाग घेतला. अनुराधा यांनी स्कॉटमध्ये १५० किलो, बेंच प्रेसमध्ये ११० किलो आणि डेडलिफ्टमध्ये १८० किलो, असे एकूण ४४० किलो वजन उचलत दमदार कामगिरी केली. श्रीलंकेच्या पश्चिम प्रांताचे माजी मुख्यमंत्री इसरु देवप्रिय पेरोरा यांच्या हस्ते त्यांना चषक प्रदान करण्यात आला. यापूर्वी भूतान येथे झालेल्या आशियाई पॉवरलिफ्टिंग स्पर्धेतही अनुराधा यांनी सुवर्णपदकांची कमाई केली आहे. त्यांच्या यशामागे महाराष्ट्राचे अध्यक्ष व शिवछत्रपती पुरस्कार विजेते तुषार दारकर, सचिव तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते संतोष शिंदे आणि राष्ट्रीय पंच निशा शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. त्या 'जिम स्ट्राईकर' येथे प्रशिक्षक स्वप्निल मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात. त्यांच्या यशाबद्दल क्रीडा क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

## आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठांसह युवकांचा रिपाइं (गवई) मध्ये प्रवेश

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्यांसह युवकांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षात प्रवेश केला. शहरजिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के यांनी नव्या कार्यकर्त्यांचे स्वागत करून सत्कार केला. संघटनात्मक विस्तारासाठी राहुल ठोकळ यांची शहर सचिवपदी, तर प्रकाश थोरात यांची शहर संघटकपदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी दानिश शेख, गुलाम शेख, विजय शिरसाठ, अजीम खान, लकी वाघमारे, शुभम ठोंबे, जमीर सय्यद, योहान चाबुकस्वार यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. रिपाइं (गवई)च्या माध्यमातून सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि संविधानिक मूल्यांच्या रक्षणासाठी काम करण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. पक्षाचे शहरजिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के यांनी रिपाइं (गवई) हा केवळ राजकीय पक्ष नसून सामाजिक न्याय आणि समतेच्या लढ्याची चळवळ असल्याचे सांगितले. नव्या पदाधिकाऱ्यांनी वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी लोकशाही मार्गाने संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# पारनेरच्या पूर्वेकडील वेशीजवळील विहिरीचा शिलालेख
# उलगडतो अठराव्या शतकातील जलसंस्कृतीचा इतिहास

**धर्मश्रद्धा, लोककल्याण आणि जलव्यवस्थेची परंपरा जपणारा दस्तऐवज । लक्ष्मण महादेव करंदीकर यांनी बांधली वापी**

**■ विजय उंडे**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
पारनेर शहराच्या पूर्वेकडील वेशीजवळ असलेल्या चौकोनी आकाराच्या नंदा प्रकारच्या बारवेतील देवळीत कोरलेला शिलालेख अठराव्या शतकातील धार्मिक श्रद्धा, जलव्यवस्था, दानपरंपरा आणि सामाजिक जीवनावर महत्त्वपूर्ण प्रकाश टाकतो. उठाव स्वरूपातील हा आठ ओळींचा शिलालेख देवनागरी लिपीत असून त्यामध्ये मराठी व संस्कृत भाषेचा वापर करण्यात आला आहे. वातावरणाच्या परिणामामुळे लेखातील काही अक्षरे झिजली असून काही अक्षरे तुटलेली आहेत. मात्र, छाप घेतल्यानंतर थोड्या प्रयत्नाने त्याचे वाचन शक्य होते. **शिलालेखाचे सुधारित वाचन पुढीलप्रमाणे आहे :**

**१. श्री गज्यानन ।। सत्क्षेत्र पारा**
**२. शर पारनेरा । तस(स्य) श्रमे मार्ग वा**
**३. नार्थ निरा ।। श्री मोरया सात्त्व्य**
**४. स्वयें निरोपि ।। लक्ष्मण महा**
**५. देव रचित वापी ।। शके १६८६ तारण**
**६. संवत्सर चैत्र शुद्ध १ ।। कपि गोत्र उप**
**७. नाव करंदीकर**
**८. दुवागीर ।। साह हसनगीर ।।**



शिलालेखाची सुरुवात श्री गज्यानन या मंगलाचरणाने होत असल्याने धार्मिक श्रद्धेतून या कार्यास प्रारंभ करण्यात आल्याचे दिसून येते. पुढे सत्क्षेत्र पारा/पारनेरा असा उल्लेख आढळतो. यावरून त्या काळात पारनेरला धार्मिक किंवा पवित्र क्षेत्र म्हणून महत्त्व प्राप्त झाले असावे.

शिलालेखातील वापी हा उल्लेख विशेष महत्त्वाचा आहे. वापी म्हणजे विहीर, बारव अथवा दगडी पाणवठा. अठराव्या शतकातील महाराष्ट्रात सार्वजनिक पाण्याची उपलब्धता हा लोकजीवनाचा अत्यंत महत्त्वाचा भाग होता. त्यामुळे या वापीची निर्मिती केवळ धार्मिक कार्य म्हणून नव्हे, तर स्थानिक नागरिक, प्रवासी आणि यात्रेकरू यांच्या उपयोगासाठी करण्यात आलेल्या लोककल्याणकारी कार्याचे उदाहरण म्हणून पाहता येते.

लेखात श्री मोरया असा उल्लेख असून त्यातून गणपत्य भक्तीपरंपरेचा प्रभाव जाणवतो. धार्मिक श्रद्धा आणि पुण्यप्राप्तीची भावना यामागे असल्याचेही या नोंदीवरून दिसून येते.

या वापीचे निर्माणकार्य लक्ष्मण महादेव यांनी केले असल्याचे शिलालेखातून स्पष्ट होते. पुढे त्यांचे कपि गोत्र आणि करंदीकर हे उपनाव नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे लक्ष्मण महादेव करंदीकर हे या जलनिर्मितीच्या कार्याचे प्रमुख कर्ते असावेत, असे दिसते.

या शिलालेखातील कालोल्लेखही महत्त्वपूर्ण आहे. शके १६८६ तारण संवत्सर चैत्र शुद्ध १ अशी नोंद त्यात आहे. ही नोंद अठराव्या शतकातील पारनेरच्या सामाजिक व धार्मिक इतिहासासाठी महत्त्वाचा कालसंदर्भ उपलब्ध करून देते. शिलालेखाचा काळ छत्रपती रामराजे यांच्या कारकीर्दीशी संबंधित असल्याची नोंदही उपलब्ध आहे.

शिलालेखाच्या शेवटी दुवागीर आणि हसनगीर अशी नावे आढळतात. या व्यक्तींची नेमकी भूमिका अधिक पुराव्यांच्या आधारे स्पष्ट होणे आवश्यक असले तरी या उल्लेखामुळे त्या काळातील स्थानिक सामाजिक व धार्मिक जीवनातील विविध घटकांच्या सहभागाची शक्यता अधोरेखित होते.

एकूणच, पारनेरच्या पूर्वेकडील वेशीजवळील हा शिलालेख केवळ विहीर अथवा वापी बांधल्याची नोंद नाही, तर तत्कालीन जलसंस्कृती, धार्मिक श्रद्धा, लोककल्याणाची भावना, दानपरंपरा आणि स्थानिक सामाजिक जीवनाचा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक पुरावा आहे. पारनेरच्या इतिहासाचा अभ्यास करताना या शिलालेखाला विशेष स्थान असून त्याचे संवर्धन आणि शास्त्रीय पद्धतीने अधिक संशोधन होणे गरजेचे आहे.

या शिलालेखाचे वाचन पुणे येथील अनिल दुधाणे व डॉ. श्री. शैलेंद्र भांडारे यांनी केले असून त्याचा संदर्भ 'पारनेर तालुक्याची ऐतिहासिक पाहणी (१९७१–७२)', पृष्ठ क्रमांक ५२ येथे प्रकाशित झाला आहे.

## 'मी वस्ताद लहुजी साळवे बोलतोय' एकपात्री प्रयोगातून सामाजिक प्रबोधन

**● पारनेर । वीरभूमी–**
महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील महापुरुषांचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने सावित्री–फातेमा सद्भावना मंचच्या वतीने प्रा. कुमार आहेर यांच्या माध्यमातून 'मी वस्ताद लहुजी साळवे बोलतोय' या एकपात्री प्रयोगाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक समता, बंधुता आणि न्यायाचा संदेश देणारा हा प्रयोग प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला.

बहुजन, दलित आणि शोषित घटकांच्या उद्धारासाठी संघर्ष करणाऱ्या महापुरुषांचे विचार समाजात रुजविणे आवश्यक आहे. मांग व महार समाजाला भेडसावणाऱ्या जातीय भेदभाव, अस्पृश्यता आणि सामाजिक अन्यायाविरोधात आवाज उठविणाऱ्या लहुजी साळवे यांच्या कार्याचे प्रभावी चित्रण या प्रयोगातून करण्यात आले.

प्रा. कुमार आहेर यांच्या ओघवत्या वाणीतील सादरीकरण आणि ताकदीच्या अभिनयातून लहुजी साळवे यांचा संघर्ष, जिद्द आणि सामाजिक परिवर्तनाची भूमिका जिवंत करण्यात आली. त्यांच्या विचारांमधून शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक समतेचा संदेश उपस्थितांपर्यंत पोहोचला. प्रयोगादरम्यान प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

सद्भावना मंचच्या या उपक्रमामुळे सामाजिक प्रबोधनाला चालना मिळाली असून, तरुण पिढीला महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांची ओळख करून देण्यास मदत होत असल्याचे उपस्थितांनी सांगितले. वैचारिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमधून सामाजिक जाणिवा अधिक समृद्ध होतात. त्यामुळे शहरासह ग्रामीण भागातही अशा प्रबोधनात्मक कार्यक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

## उद्यापासून स्व. दादापाटील राजळे स्मृती व्याख्यानमाला

**विविध विषयांवर मान्यवरांचे मार्गदर्शन । गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार**

**● पाथर्डी । वीरभूमी–**
सहकार महर्षी स्व. दादापाटील राजळे (भाऊ) यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त दादापाटील राजळे महाविद्यालय, आदिनाथनगर येथे स्व. दादापाटील राजळे स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन गुरुवार, दि. २० ते शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे. व्याख्यानमालेचे हे २१ वे वर्ष असून, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजधर टेमकर यांनी दिली.

व्याख्यानमालेचे उद्घाटन बी.एम.सी.सी. कॉलेज, पुणेचे उपप्राचार्य डॉ. प्रशांत साठे यांच्या हस्ते होणार आहे. ते 'स्क्रीन टाईम ते ग्रीन टाईम' या विषयावर मार्गदर्शन करणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार मोनिकाताई राजीव राजळे असतील.




व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प प्रसिद्ध उद्योजक, वक्ते व लेखक बी. एन. धुमाळ यांच्या 'युवकांनो उद्योजक व्हा!' या विषयावरील व्याख्यानाने गुंफले जाणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संचालक उद्धवराव वाघ असतील.

व्याख्यानमालेचा समारोप सह्याद्री फार्म, नाशिकचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर विलास शिंदे यांच्या 'शेतीतील संधी व उद्योजकता' या विषयावरील व्याख्यानाने होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार अप्पासाहेब राजळे असतील. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे अधिष्ठाता डॉ. हरिभाऊ मोरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

यावेळी स्व. सौ. चंद्रभागाबाई दादापाटील राजळे व सर्व सेवाभावी संस्था, आदिनाथनगर यांच्या वतीने तालुक्यातील गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार करण्यात येणार आहे.

कार्यक्रमास बाबासाहेब किलबिले, राहुलदादा राजळे, सुभाषराव ताठे, गुलाबराव राजळे, शिवाजीराव राजळे यांच्यासह शिक्षण संस्थेचे सर्व विश्वस्त उपस्थित राहणार आहेत.

परिसरातील विद्यार्थी, पालक व नागरिकांनी या व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. राजधर टेमकर यांनी केले आहे.

## 'हर घर तिरंगा - विकसित भारत की ओर'चा संदेश देत स्नेहालयमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये १५ ऑगस्ट रोजी भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन देशभक्ती, उत्साह आणि आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. यंदाची संकल्पना 'हर घर तिरंगा – विकसित भारत की ओर' अशी होती.



कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून स्नेहालयचे माजी विद्यार्थी व उद्योजक वैभव बाळू रहाणे उपस्थित होते. तसेच रोटरी क्लबचे अध्यक्ष अमर गुरप, पदाधिकारी तागड सर, भोगा सर, स्नेहालयचे विश्वस्त राजीव गुजर, संजय बंदिष्टी, संचालक हनीफ शेख, शाळेच्या संचालिका मंदा हांडे, पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, ध्वजगीत, ध्वजप्रतिज्ञा तसेच 'नशामुक्त विद्यार्थी – नशामुक्त महाराष्ट्र' प्रतिज्ञा घेतली. आकर्षक परेड, देशभक्तीपर गीत व नृत्य, भाषणे, स्वातंत्र्यसैनिकांच्या वेशभूषा तसेच पिरॅमिड प्रात्यक्षिकातून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची वाहवा मिळवली.

समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सुजाता मासोळे, जयंती पाटील, सविताताई वाहूरवाघ, आयेशा शेख आणि मंगलताई गाडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र अंमली पदार्थमुक्त अभियान व शून्य सहनशीलता धोरणांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये अंमली पदार्थांविरोधात जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका शीतल गुंदेचा, जयश्री खरात, सविता बेल्हेकर, सागर सर तसेच स्नेहालय परिवारातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. चंद्रकांत शेबडे यांनी आभार मानले. विद्यार्थ्यांना गोड खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## 'एक पेड, दोस्ती के नाम' उपक्रमाचा शुभारंभ

**मित्राप्रमाणेच वृक्षांची काळजी घ्या : अक्षय पवार । माजी विद्यार्थ्यांकडून १०० देशी वृक्षांची लागवड**

**● पाथर्डी । वीरभूमी –**
मानवाप्रमाणेच वृक्षांशीही मैत्रीचे व जिव्हाळ्याचे नाते जोडणारा 'एक पेड, दोस्ती के नाम' हा उपक्रम निसर्गाशी अधिक घट्ट संबंध जोडणारा आहे. कुटुंबातील व्यक्ती किंवा मित्राप्रमाणे प्रत्येकाने वृक्ष व निसर्गाची काळजी घेतल्यास आगामी काळात मानवजातीसमोर पर्यावरणाचे मोठे संकट उभे राहणार नाही. त्यामुळे प्रत्येकाने वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाची जबाबदारीही स्वीकारावी, असे आवाहन प्रशिक्षणार्थी वनपरिक्षेत्र (खत्रड) अधिकारी अक्षय पवार यांनी केले.



स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून शहरातील श्री तिलोक जैन विद्यालयातील १९९६ सालच्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने 'एक पेड, दोस्ती के नाम' उपक्रम सुरू करण्यात आला. या उपक्रमांतर्गत शहर व परिसरात विविध देशी जातींच्या १०० वृक्षांची लागवड करण्यात येत आहे. विशेष म्हणजे सुमारे १० ते १२ फूट उंचीची व दोन ते तीन वर्षे वयाची रोपे लावण्यात येत असून, त्यांना लोखंडी जाळीचे भक्कम संरक्षण देण्यात येत आहे. त्यामुळे वृक्षांचे संगोपन होऊन ते जगण्याचे प्रमाण वाढण्यास मदत होणार आहे.

शहरातील विविध भागांत वृक्षांची लागवड करून प्रत्येक वृक्षाच्या संवर्धनाची जबाबदारी एका व्यक्तीवर निश्चित करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी अक्षय पवार बोलत होते. यावेळी श्री तिलोक जैन विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी, उद्योजक आनंद चोरडिया तसेच माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्राचार्य अजय भंडारी म्हणाले की, अनेक ठिकाणी निसर्गाचा ऱ्हास होत असल्याने पर्यावरणाचे संतुलन बिघडत आहे. अशा वृक्षारोपण मोहिमांमुळे निसर्गाचा समतोल राखण्यास मदत होईल. या उपक्रमाचा शहर व परिसराला मोठा फायदा होणार असून, अशा स्तुत्य उपक्रमासाठी विद्यालयाच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य केले जाईल.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## सेंट मायकलची दुहेरी विजयी आगेकूच

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत सेंट मायकल स्कूलने दोन्ही वयोगटांत शानदार विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. १२ वर्षांखालील गटात सेंट मायकलने आयकॉन पब्लिक स्कूलचा १-० असा पराभव केला. नावील याने १९व्या मिनिटाला केलेला गोल निर्णायक ठरला. उत्तरार्धात आयकॉनने बरोबरीसाठी जोरदार प्रयत्न केले; मात्र सेंट मायकलच्या बचावफळीने त्यांचे सर्व प्रयत्न हाणून पाडले. १४ वर्षांखालील गटात सेंट मायकल आणि आर्मी पब्लिक स्कूल यांच्यातील सामना १-१ असा बरोबरीत राहिला. सेंट मायकलच्या ऋषीने १२व्या मिनिटाला, तर आर्मीच्या दिग्विजयने १५व्या मिनिटाला गोल केला. टायब्रेकरमध्ये सेंट मायकलने ४-३ असा विजय मिळवला. सेंट मायकलकडून विधान, अनीश, ऋषी आणि इशान पठारे यांनी गोल नोंदवले.

## केडगावातील शासकीय साठा प्रकरणाची चौकशी रखडली

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

केडगाव शिवारातील खासगी गोदामात महिला व बाल विकास विभागाचा पोषण आहार आणि कृषी विभागाचा शासकीय बियाणे साठा आढळून जप्त केल्याच्या प्रकरणाची चौकशी अद्याप पूर्ण झालेली नसल्याचा आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीने केला आहे. शासकीय साठा गोदामापर्यंत कसा पोहोचला आणि यामागे कोणाचा सहभाग आहे, याची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी केली आहे. जिल्हा कृषी अधिकारी, पालकमंत्री आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देत सात दिवसांत ठोस कारवाईची मागणी करण्यात आली आहे. कारवाई न झाल्यास २४ ऑगस्टपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा समितीने दिला आहे.

## मिसगर ज्युनिअर कॉलेजमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

नागोरी मुस्लिम मिसगर जमात ट्रस्ट संचलित अहमदनगर उर्दू प्रायमरी स्कूल, अहमदनगर उर्दू हायस्कूल व मिसगर ज्युनिअर कॉलेज तसेच एम्स इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. मिसगर लायब्ररी परिसरात आयोजित या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सईद सोलापुरे आणि सोहेल हनीफ उपस्थित होते. तसेच नागोरी मुस्लिम मिसगर जमात ट्रस्टचे विश्वस्त वाजिद जावेद खान व इफ्तिखार अकील अहमद खान यांची विशेष उपस्थिती लाभली. यावेळी विद्यार्थ्यांनी उर्दू, मराठी, हिंदी आणि इंग्रजी या विविध भाषांमध्ये देशभक्तीपर भाषणे, कविता व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसरात देशभक्तीने भारावले होते. याप्रसंगी अहमदनगर उर्दू प्रायमरी स्कूलच्या मुख्याध्यापिका खान रुमाना, अहमदनगर उर्दू हायस्कूल व मिसगर ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य खान मुनव्वर हुसेन सर तसेच एम्स इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका खान साबा यांची प्रमुख उपस्थिती होती.

# पाथर्डीतील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा

### माहेश्वरी युवक मंडळाचे नगरपरिषदेला निवेदन । अन्यथा आंदोलन करण्याचा दिला इशारा

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी शहरातील माहेश्वरी श्रीराम मंदिर व शेवाळे गल्ली परिसरात मोकाट व हिंसक कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून, नागरिक, महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व भाविकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी माहेश्वरी युवक मंडळाच्या वतीने पाथर्डी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. मागणीची दखल न घेतल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही मंडळाने दिला आहे.



श्रीराम मंदिरात सध्या सलग १५ दिवस महिलांचा 'तीज' हा पवित्र सण सुरू आहे. तसेच श्रावण महिन्यामुळे मंदिरात दर्शन व पूजेसाठी महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. मात्र, मंदिर परिसर व शेवाळे गल्ली भागात मोकाट कुत्र्यांच्या टोळ्यांचा वावर वाढल्याने भाविकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या कुत्र्यांकडून नागरिकांवर अचानक हल्ले करण्याच्या घटनाही घडत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

माहेश्वरी श्रीराम मंदिर परिसरात दररोज ये-जा करणाऱ्या महिला भाविकांसह गोविंद लाहोटी व शालेय विद्यार्थी सोहम बजाज यांच्यावर मोकाट कुत्र्यांनी अचानक हल्ला करून चावा घेण्याचा प्रयत्न केल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच १५ ऑगस्ट रोजी पहाटे साडेपाचच्या सुमारास खोलेश्वर मंदिरात दर्शनासाठी जात असलेल्या एका नागरिकावर मोकाट कुत्र्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात त्यांच्या हाताला फ्रॅक्चर झाले असून, नगर येथील पंडित हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू असल्याचे निवेदनात नमूद आहे.

काही दिवसांपूर्वी कल्याण येथे मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात एका चिमुकल्या मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनेचा संदर्भ देत, पाथर्डी शहरातही अशी गंभीर घटना घडण्याची प्रशासन वाट पाहत आहे का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

पाथर्डी नगरपरिषदेने यापूर्वी मोकाट कुत्र्यांना पकडून त्यांचे निर्बीजीकरण करण्याची मोहीम राबविली होती. मात्र, केवळ निर्बीजीकरण करून प्रश्न सुटणार नसून, नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या हिंसक कुत्र्यांबाबत तातडीने प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे. शहरातील हिंसक मोकाट कुत्र्यांना तातडीने पकडून त्यांचा बंदोबस्त करावा आणि महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व भाविकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

यावेळी माजी नगरसेवक रामनाथ बंग, पंकज राठी, सागर बाहेती, राधेश्याम मंत्री, महेश बाहेती, स्वप्नील पलोड, ओम डागा, रितेश मंत्री, योगेश कलंत्री, कन्हैया लाहोटी, गोविंद लाहोटी, गोपाल हारकुट, जगदीश लाहोटी, प्रणव जाजु, सचिन डागा, आलोक बंग आदी माहेश्वरी युवक मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

## कांदा उत्पादकांना सावधानतेचा इशारा

### चढ्या दराचे आमिष दाखवणाऱ्या खासगी व्यापाऱ्यांपासून सावध राहण्याचे आवाहन

**● पारनेर । वीरभूमी–**

कांद्याच्या भावात सध्या वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची फसवणूक होण्याची शक्यता लक्षात घेता, कांदा उत्पादकांनी सावधगिरी बाळगावी, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समिती, पारनेरच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

कांद्याचे भाव वाढल्याने काही खासगी व्यापारी शेताच्या बांधावरच चढ्या दराने कांदा खरेदी करण्याचे आमिष दाखवत असल्याच्या तक्रारी व चर्चा सुरू आहेत. रोख पैसे देण्याचे आश्वासन देऊन कांदा ताब्यात घेतल्यानंतर वजन, दर अथवा पेमेंटमध्ये फसवणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पूर्ण रक्कम मिळाल्याशिवाय कांदा व्यापाऱ्यांच्या ताब्यात देऊ नये, असा इशारा बाजार समितीने दिला आहे.

शेतकऱ्यांनी शक्यतो एकाच वेळी मोठ्या प्रमाणात कांदा विक्री न करता टप्प्याटप्प्याने जवळच्या बाजार समितीत विक्री करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. बाजार समितीत शेतमाल दाखल झाल्यानंतर प्रत्येक गोणीचे वजन केले जाते. त्यानंतर शेतकऱ्यांच्या उपस्थितीत जाहीर लिलाव पद्धतीने कांद्याची विक्री केली जाते. व्यवहाराची नोंद ठेवली जात असल्याने वजन, दर आणि पेमेंटमध्ये पारदर्शकता राहते.

वर्षभर कष्ट करून पिकविलेला कांदा एकाच वेळी खासगी व्यापाऱ्याला देऊन संभाव्य फसवणुकीचा धोका पत्करण्यापेक्षा टप्प्याटप्प्याने बाजार समितीत विक्री करणे शेतकऱ्यांच्या हिताचे ठरेल, असे बाजार समिती प्रशासनाने स्पष्ट केले आहे. 'थेंबे थेंबे तळे साचे' या म्हणीप्रमाणे शेतकऱ्यांनी नियोजनपूर्वक कांदा विक्री करून आपल्या कष्टाचा योग्य मोबदला मिळवावा, असे आवाहन सभापती, उपसभापती, संचालक मंडळ, सचिव तसेच व्यापारी बांधवांच्या वतीने करण्यात आले आहे.

## न्यू इंग्लिश स्कूल मढेवडगाव येथे विविध उपक्रमांनी स्वातंत्र्यदिन साजरा

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

स्वातंत्र्यदिनाच्या मंगलमयी पर्वावर मढेवडगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल मध्ये शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) २०२६' या अभिनव प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.



ध्वजारोहण सरपंच प्रमोद शिंदे यांनी केले व एआय प्रदर्शनाचे उद्घाटन जेष्ठ नागरिक विठ्ठलराव वाबळे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स व स्मार्ट तंत्रज्ञानावर आधारित विविध प्रकल्प, स्मार्ट सेन्सर्स, हार्डवेअर मॉडेल्स तसेच डिजिटल स्मार्ट क्लासमधील उपक्रमांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व तांत्रिक कौशल्याला प्रोत्साहन देणाऱ्या या प्रदर्शनास पालक, ग्रामस्थ व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

स्वरा साबळे, हुमेरा शेख, आयुष ठोकळे, श्रेया पवार, स्वराली शेळके यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून निबंध व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. निबंध स्पर्धेत कार्तिकी वाबळे, अनुराधा गांगोडे, छकुली उबाळे, राधिका गांगोडे, श्रुती शिंदे, गौरी मांडे तर वक्तृत्व स्पर्धेत स्वरूपा जगताप, कार्तिकी वाबळे, आदिती उबाळे, स्वराली शिर्के, प्रिया कटारे, तेजस्विनी गटने या स्पर्धकांनी बाजी मारली.

विद्यार्थ्यांनी केलेली सामूहिक संगीत कवायत, स्काऊट गाईड चे संचलन याचे ग्रामस्थांनी, पालकांनी कौतुक केले.

याप्रसंगी सरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी चेअरमन, सर्व सदस्य, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य, विविध शालेय समित्यांचे पदाधिकारी, मढेवडगाव आणि पंचक्रोशीतील शिक्षण प्रेमी ग्रामस्थ, शाखा हितचिंतक, पालक, माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सुपा येथे 'दहा कोटी नशामुक्ती महाअभियान'

### ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचा उपक्रम । विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा



**● पारनेर । वीरभूमी–**

सुपा येथील न्यू इंग्लिश स्कूल कला, वाणिज्य व कनिष्ठ विद्यालयात प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, पारनेर सेंटरच्या वतीने 'दहा कोटी नशामुक्ती महाअभियान' या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. पारनेर सेंटरच्या संचालिका ब्रह्माकुमारी साधना दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य मंगेश जाधव होते. यावेळी पर्यवेक्षक अनिल खांदवे, सुवर्णा पाडेकर, जितेंद्र झरेकर, पुष्पा शिंदे, तेजश्री पवार, बापू तांबे, संजय बर्डे, शोभा भालेराव, मोरे सर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

ब्रह्माकुमारी साधना दीदी यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांचे शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि सामाजिक दुष्परिणाम समजावून सांगितले. तंबाखू, गुटखा, सिगारेट, मद्यपान तसेच इतर व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन करत युवकांनी निरोगी जीवनशैली स्वीकारून समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवावा, असे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या मनावर व्यसनांचे दुष्परिणाम बिंबविण्यासाठी जनजागृतीपर मार्गदर्शन करण्यात आले. व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखणे गरजेचे असून, विद्यार्थ्यांनी स्वतः व्यसनांपासून दूर राहण्याबरोबरच कुटुंबीय आणि मित्रपरिवारातही व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करावी, असा संदेश यावेळी देण्यात आला.

'दहा कोटी नशामुक्ती महाअभियान' हा उपक्रम युवक व विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि आरोग्यदायी जीवनशैली निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले. विद्यालयाच्या वतीने या सामाजिक उपक्रमाचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा देण्यात आली.

## पाथर्डीत वर्षावासानिमित्त 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म'चे वाचन

### वर्षावासाच्या १८व्या दिवशी धम्म-अधम्म-सद्धम्म विषयावर चिंतन

**● पाथर्डी । वीरभूमी–**

तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या विचारांचा आणि धम्माचा दैनंदिन जीवनाशी संबंध जोडण्यासाठी पाथर्डी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे वर्षावासनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे नियमित वाचन व चिंतन सुरू आहे. भारतीय बौद्ध महासभा, पाथर्डी तालुका शाखेच्या वतीने २९ जुलै (आषाढ पौर्णिमा) ते २६ ऑक्टोबर (अश्विनी पौर्णिमा) या कालावधीत हा उपक्रम राबविण्यात येत आहे.



शनिवार, १५ ऑगस्ट रोजी वर्षावासाच्या अठराव्या दिवशी 'धम्म म्हणजे काय? अधम्म म्हणजे काय? आणि सद्धम्म म्हणजे काय?' या विषयावर ग्रंथवाचन व चिंतन करण्यात आले. प्रा. गौतम ढेकणे यांनी प्रभावी पद्धतीने ग्रंथाचे वाचन केले.

पाथर्डी शहरात मागील वर्षापासून तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी सांगितलेल्या मार्गानुसार वर्षावास साजरा केला जात आहे. भारतीय बौद्ध महासभा, पाथर्डी शाखेचे अध्यक्ष श्रीपतराव (दादा) बळीद यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. वर्षावासानिमित्त विविध क्षेत्रांतील तसेच विविध जाती-धर्मांतील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत असून, या उपक्रमातून सामाजिक सलोखा व बंधुभावाचे दर्शन घडत आहे.

यावेळी किशोर राजगुरू, सीताराम बोरुडे, हाजी हुमायूनभाई आतार, महेंद्र राजगुरू, एकनाथ ठोकळ, दिगंबर गाडे, दिलीप सरसे, बौद्धाचार्य भीमराज शिंदे, प्रा. अशोक डोळस, प्रा. आनंद घोंगडे, प्रा. गौतम ढेकणे, संजय राजगुरू, भारत गाडेकर, सचिन साळवे, अनिल खंडागळे, श्रीकांत उर्फ पप्पू बोर्डे आदी मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमाला महिला, तरुण, विद्यार्थी तसेच माता-भगिनींचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. भारतीय बौद्ध महासभा महिला आघाडीच्या अध्यक्षा मीनाताई शिंदे यांच्यासह मंदाकिनी गाडे, ज्योती राजगुरू, मनीषा ठोकळ, प्रज्ञा डोळस, नम्रता घोंगडे, रमा ढेकणे, मनोरमा राजगुरू, आश्लेषा क्षेत्रे, मीना सरसे, सुनीता बळीद आदी महिला नियमित सहभागी होत आहेत.

'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे वाचन म्हणजे केवळ ग्रंथवाचन नसून, दैनंदिन जीवनात कुशल कर्म करणे, परस्परांमध्ये मैत्रीभाव जपणे, एकमेकांच्या सुख-दुःखात सहकार्य करणे तसेच समाजात शांतता, समता व बंधुभाव रुजविण्याचा संदेश या उपक्रमातून दिला जात आहे. आजच्या अस्वस्थ आणि संघर्षमय वातावरणात तथागत भगवान बुद्धांचा शांतता, समता व मानवतावादी धम्म जगाला आवश्यक असल्याची जाणीव या उपक्रमातून होत आहे.

या उपक्रमासाठी अनेक मान्यवरांनी धम्मदान देऊन सहकार्य केले. ग्रंथवाचनानंतर गाडे परिवाराच्या वतीने उपस्थितांसाठी अल्पोपाहार देण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन दिगंबर गाडे यांनी केले, तर वंचित बहुजन आघाडीचे पाथर्डी तालुकाध्यक्ष श्रीकांत बोर्डे यांनी आभार मानले.

# मुळा चारीला पाणी सोडा, अन्यथा आंदोलन

**शिवशंकर राजळे यांचे तहसीलदारांना निवेदन । २५ ऑगस्ट रोजी रास्तारोकोचा इशारा**

**● पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यात पावसाने दडी मारल्याने पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले आहे. पावसाअभावी खरीप पिके जळण्याच्या मार्गावर असल्याने मुळा धरणाच्या पाथर्डी चारीला तातडीने पाणी सोडावे, अन्यथा तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पाथर्डी तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

याबाबत पाथर्डीचे तहसीलदार उद्धव नाईक यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनावर शिवशंकर राजळे यांच्यासह बाळासाहेब ताठे, भानुदास आमटे, दगडू कोठुळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे रमेश कचरे, बाळासाहेब गर्जे, दादासाहेब ढमाळ, बाळासाहेब वळवे आदींच्या सह्या आहेत.



या निवेदनात म्हटले की, मुळा धरणात सध्या ९० टक्के पेक्षा जास्त पाणीसाठा झाला असून धरणातील आवक देखील सुरु आहे. सध्या पाथर्डी तालुक्यात पावसाने ताण दिल्याने दुष्काळीपरिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक गावांमध्ये पिण्याचे पाण्याचे टँकर सुरु आहेत. तर अनेक भागांमध्ये उस, तूर, कपाशी आणि इतर पिके पावसाअभावी जळून जाण्याच्या मार्गावर आहेत. पाथर्डीच्या उत्तर भागातील जवळपासदहा ते बारा गावांमधून मुळा धरणाची चारी आहे.

मुळा धरणातील पाण्याची आवक पहाता पाथर्डी चारीला पाणी सोडले तर जी काही पिके उभी आहेत ती वाचण्यास मदत होईल. तसेच शेवगाव तालुक्यामध्ये पाण्याचे टँकर भरतात ते या भागात भरुन पाथर्डी तालुक्यातील उर्वरित तहानलेल्या गावांची पिण्याच्या पाण्याची गरज भागवली जाईल. त्यामुळे तातडीने पाथर्डी चारीला पाणी सोडण्यासंदर्भात उचित कार्यवाही करावी, अन्यथा दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी शेवगाव– तिसगाव रस्त्यावरील पाडळी येथे रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

या निवेदनाच्या प्रती मुळा धरणाचे कार्यकारी अभियंता व अमरापूर विभागाचे उपअभियंता यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

# मुळा धरणातून तातडीने आवर्तन सोडा : आमदार मोनिका राजळे यांची मागणी

**पाऊस लांबल्याने शेवगाव-पाथर्डीतील पिके संकटात । पिण्याच्या पाण्याचीही टंचाई**

**● शेवगाव । वीरभूमी–**

पाऊस लांबल्याने शेवगाव आणि पाथर्डी तालुक्यांतील खरीप पिके कोमेजू लागली असून, ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी आणि नागरिकांची पाणी समस्या सोडवण्यासाठी मुळा धरणातून उजव्या कालव्यात तातडीने आवर्तन सोडावे, अशी आग्रही मागणी आमदार मोनिका राजीव राजळे यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

आमदार राजळे यांनी पत्रात म्हटले आहे की, शेवगाव आणि पाथर्डी तालुक्यांतील शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान मोठ्या प्रमाणात खरीप पिकांवर अवलंबून आहे. चालू हंगामात शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरण्या पूर्ण केल्या; मात्र गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने उभी पिके कोमेजत असून, पिकांना तातडीने पाटपाण्याची गरज



निर्माण झाली आहे. शेतीसोबतच तालुक्यांतील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू लागली असून, विविध पाणी योजनांचे जलस्रोत कोरडे पडत आहेत. त्यामुळे मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी व नागरिकांकडून पाणी सोडण्याची मागणी सातत्याने होत आहे.

मुळा धरणात सध्या पुरेसा जलसाठा उपलब्ध असल्याने प्रशासनाने दिरंगाई न करता शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी 'टेल टू हेड' नियमानुसार आवर्तन सुरू करावे, अशी मागणी राजळे यांनी केली आहे. या नियमानुसार शेवटच्या गावातील शेवटच्या शेतकऱ्याच्या शेतापर्यंत प्रथम पाणी पोहोचवून त्यानंतर वरच्या भागाला पाणी देण्यात यावे, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

> पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे मुळा धरणातून टेल टू हेड नियमानुसार आवर्तन सोडण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीला यश आले असून लवकरच मुळा धरणातून आवर्तन सोडले जाणार आहे.
>
> **– आ. मोनिका राजळे**

याबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना योग्य ते आदेश देऊन शेतकरी व नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी आमदार राजळे यांनी केली आहे. पत्राची प्रत मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनाही पाठविण्यात आली आहे.

# देश घडविण्यासाठी युवा समृद्ध व निर्व्यसनी असावा : ब्रह्माकुमारी दीपा दीदी

**चापडगाव विद्यालयातील ५०० विद्यार्थ्यांनी घेतली नशामुक्तीची प्रतिज्ञा**

**● शेवगाव । वीरभूमी–**

देश चांगला घडविण्यासाठी आजचा युवा वर्ग समृद्ध आणि निर्व्यसनी असणे आवश्यक आहे. राष्ट्राचा सर्वात मोठा शत्रू म्हणजे नशा असून, नशेमुळे व्यक्तीचा सर्वांगीण नाश होतो, असे प्रतिपादन ब्रह्माकुमारी दीपा दीदी यांनी केले.



चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात नशामुक्ती संकल्प महाअभियानांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य संपत दसपुते होते. व्यासपीठावर माजी सरपंच संजीवनी गायकवाड, बबनराव गायकवाड, उपप्राचार्य सुनील जायभाये, वत्सला जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

दीपा दीदी म्हणाल्या की, समाज सुधारण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. नशेमुळे व्यक्ती कमजोर बनते, आत्मबल कमी होते आणि आर्थिक परिस्थितीवरही परिणाम होतो. नशेचे जाळे थांबविण्यासाठी पालक, विद्यार्थी आणि समाजाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. सकारात्मक विचार करून मन शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्राचार्य संपत दसपुते म्हणाले की, अनेक गुन्हे नशेमुळे घडतात. नशामुक्तीसाठी वयाचा भेद न करता लहानांनीही मोठ्यांना व्यसनापासून दूर राहण्यास प्रवृत्त करावे. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एका व्यक्तीला नशेपासून दूर करण्याची जबाबदारी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमादरम्यान सुमारे ५०० विद्यार्थ्यांनी ब्रह्माकुमारी दीपा दीदी यांच्या उपस्थितीत नशामुक्तीची प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सर्जेराव निकाळजे यांनी केले, तर संजय मरकड यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

या महाअभियानातून किमान १० कोटी लोकांना व्यसनापासून मुक्त करण्याचा संकल्प असून, हे अभियान भारतभर अखंडपणे सुरू ठेवण्याचा मानस असल्याचे ब्रह्माकुमारी दीपा दीदी यांनी सांगितले.

# श्रीगोंद्याचे सुपुत्र सुनिल गव्हाणे यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेसची मोठी जबाबदारी

**फ्रंटल व सर्व सेलच्या प्रदेश समन्वयकपदी नियुक्ती**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या संघटनात्मक विस्तारात श्रीगोंदा तालुक्यातील गव्हाणेवाडीचे सुपुत्र सुनिल विजय गव्हाणे यांच्यावर पक्षाने महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणून गेल्या सहा वर्षांपासून काम पाहणाऱ्या गव्हाणे यांची फ्रंटल व सर्व सेल प्रदेश समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी नियुक्तीपत्राद्वारे ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविली.



श्रीगोंदा तालुक्यातील गव्हाणेवाडी येथून पिंपरी–चिंचवड शहरात गेलेल्या सुनिल गव्हाणे यांनी विद्यार्थी चळवळीतून आपल्या राजकीय व सामाजिक कार्याला सुरुवात केली. पिंपरी–चिंचवड शहर विद्यार्थी कार्याध्यक्ष, त्यानंतर शहराध्यक्ष अशी जबाबदारी सांभाळल्यानंतर त्यांच्या संघटनात्मक कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली.

प्रदेशाध्यक्ष म्हणून काम करताना गव्हाणे यांनी राज्यातील विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना सातत्याने वाचा फोडली. शुल्क, शिष्यवृत्ती, परीक्षा, प्रवेश प्रक्रिया तसेच शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांवर आंदोलने, निवेदने आणि जनजागृतीच्या माध्यमातून त्यांनी भूमिका मांडली. या काळात राज्यभरातील विद्यार्थी, युवक आणि कार्यकर्त्यांशी त्यांचा मोठा संपर्क निर्माण झाला.

विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून उभारलेले संघटनात्मक जाळे आणि पक्षासाठी केलेल्या योगदानाची दखल घेत आता पक्षाने त्यांच्यावर अधिक व्यापक जबाबदारी सोपविली आहे. फ्रंटल संघटना व विविध सेल यांच्यात समन्वय साधणे, पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद वाढविणे, संघटनात्मक काम अधिक प्रभावी करणे आणि पक्षाची ताकद वाढविण्यासाठी प्रयत्न करणे, अशी जबाबदारी गव्हाणे यांच्यावर राहणार आहे.

नियुक्तीनंतर प्रतिक्रिया देताना सुनिल गव्हाणे म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून पक्ष संघटनेत काम करत आहे. मात्र राजकीय क्षेत्रात सक्रिय असतानाही वेळेअभावी ज्या तालुक्याचा सुपुत्र आहे, त्या श्रीगोंदा तालुक्यातील लोकांसाठी अपेक्षित स्वरूपात काम करता आले नाही. यापुढे पक्षाच्या व्यासपीठाचा उपयोग तालुक्यातील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी करणार असून, लोकांच्या प्रश्नांसाठी पुढाकार घेणार आहे.

विद्यार्थी चळवळीपासून सुरुवात करून राज्यस्तरीय संघटनात्मक जबाबदारीपर्यंत झालेली सुनिल गव्हाणे यांची वाटचाल त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे.

# आलिया सय्यदची शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत निवड

**राळेगण थेरपाळच्या पीएमश्री शाळेचे घवघवीत यश; १० विद्यार्थी पात्र**

**● वडनेर । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत पारनेर तालुक्यातील पीएमश्री जि. प. प्राथमिक शाळा, राळेगण थेरपाळने उल्लेखनीय यश मिळवले. शाळेची इयत्ता चौथीची विद्यार्थिनी आलिया सादिक सय्यद हिने २३६ गुण मिळवत जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान पटकावले, तर शाळेचे एकूण १० विद्यार्थी परीक्षेस पात्र ठरले.

विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका नबाबाई नाना रायकर (साबळे) तसेच संदीप दिलीप पागिरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. वर्षभर घेण्यात आलेले अतिरिक्त तास आणि अचूक मार्गदर्शनामुळे हे यश मिळाले, असे मुख्याध्यापक पंढरीनाथ रेपाळे यांनी सांगितले.



नबाबाई रायकर यांच्या मार्गदर्शनाखाली यापूर्वी २०२२ मध्ये इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत दोन विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत झळकले होते. याच वर्षी इयत्ता पाचवीचे तीन विद्यार्थीही जिल्हा गुणवत्ता यादीत दाखल झाले आहेत. प्रकाशकुमार दळवी, अनिता शिरोळे, झरेकर, साळवे व गुंजाळ या शिक्षकांचेही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

पारनेर तालुक्यातील सर्वाधिक पटसंख्या असलेल्या जिल्हा परिषद शाळांपैकी राळेगण थेरपाळ शाळेची शैक्षणिक गुणवत्तेसाठी विशेष ओळख आहे. स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठीही शाळा नावाजलेली असून, विविध शैक्षणिक उपक्रम येथे राबविले जातात. दोन वर्षांपूर्वी शाळेची पीएमश्री शाळा म्हणून निवड झाली आहे. २४ संगणकांची सुसज्ज कार्यशाळा, भूगोल कार्यशाळा, अद्ययावत इमारत, मेहनती शिक्षकवृंद आणि विविध सुविधांनी शाळा सज्ज आहे.

जिल्हा परिषद शाळाही गुणवत्तेच्या बाबतीत सक्षम आहेत, हे राळेगण थेरपाळ शाळेने आपल्या यशातून दाखवून दिले आहे. या यशाबद्दल सरपंच पंकजदादा कारखिले, उपसरपंच नरेश सोनवणे, माजी सरपंच कैलास डोमे, सदस्य बाजीराव कारखिले, किरण भगवान कारखिले, किरण बाळासाहेब कारखिले, सर्व ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गोरक्ष पाचंगे, उपाध्यक्ष जयेश सरोदे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष दीपक कारखिले, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष निलेश शितोळे, गटशिक्षणाधिकारी तेजस्विनी पवार, शिक्षण विस्तार अधिकारी व्होरा, केंद्रप्रमुख एन. एम. बाचकर व मुख्याध्यापक पंढरीनाथ रेपाळे यांनी गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जनआधार फाउंडेशनतर्फे तोंडोळीच्या हरीहरेश्वर विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**● पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यातील तोंडोळी येथील श्री हरीहरेश्वर माध्यमिक विद्यालयात स्वातंत्र्यदिनानिमित्त विविध कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी जनआधार फाउंडेशनच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी झुंबड महाराज होते. प्रमुख पाहुण्या म्हणून जनआधार फाउंडेशनच्या अध्यक्षा राधिकाताई खेमनर उपस्थित होत्या. यावेळी नवनाथ महाराज वारंगुळे, उपसरपंच सतीश वारंगुळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष नानाभाऊ पडळकर, शिवाजीराव देशमुख, मुख्याध्यापक प्रल्हाद खाडे, सरपंच रामकिसन भिसे यांच्यासह शिक्षक, ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शैक्षणिक गुणवत्तेत प्रथम क्रमांक मिळविणारे अभिजित चंद्रकांत झिरपे, द्वितीय क्रमांकाची तनुजा प्रल्हाद उफळे आणि तृतीय क्रमांकाची नेहा विष्णू पवार यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रोत्साहनपर भेटवस्तू देऊन त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी मार्गदर्शन करताना राधिकाताई खेमनर यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत संस्कार, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासावी, असे आवाहन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता व प्रतिभेची कमतरता नसून, त्यांना योग्य प्रोत्साहन व संधी मिळणे आवश्यक आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरतो, असे त्यांनी सांगितले.

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यालय परिसरात देशभक्तीपूर्ण वातावरण होते. विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांत उत्स्फूर्त सहभाग घेतला. जनआधार फाउंडेशनच्या उपक्रमामुळे गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळाले असून, त्यांच्या यशाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.